# मौल्यवान आठवणी - भाग ६

आज १, जुलै. आज बरोबर ४४ वर्षापूर्वी पराग जन्मला. मी परागला सकाळी ७:३९ ला फोन लावला आणि हॅपी बर्थ डे टू यू, हॅपी बर्थ डे टू यू, हॅपी बर्थ डे डियर पराग, हॅपी बर्थ डे टू यू असे गाणे म्हटले. त्याने थँक्यू मामी म्हटले. त्याचा झोपाळू आवाज ऐकून मी त्याला म्हटले, "अजून झोपला आहेस तू? पराग रोज पहाटे पांचलाच उठतो. त्याच्या दोन्ही कुत्र्यांना, आर्थर आणि रिव्हरला, बॅकयार्डमध्ये सोडतो. पांचदहा मिनिटांनी कुत्री घरांत येतात. मग त्यांना तो जेवायला देतो. त्यानंतर त्यांना वॉकिंगला घेऊन जातो. त्यानंतर तयार होऊन कामावर जातो. हा त्याचा रुटीन मागील कित्येक वर्षापासून आहे. मी त्याला नेहमी म्हणते, माणसांची मुलं पहिलं वर्षभर पहाटे दोन आणि सहाला उठतात मग थोडी मोठी झाल्यावर सकाळी आठच्या दरम्यान उठतात. तुमची ही कुत्री जन्मभर मोठीच होत नाहीत. पनिशमेंटच आहे, एक प्रकारे जन्मठेपच. पण परागला त्याचे कांही वाटत नाही. तो त्याच्या कुत्र्यांचे खूप लाड करतो. त्यामुळे मला नवल वाटले, हा अजूनपर्यंत झोपला कसा? कुत्र्यांनी झोपू दिले? तो म्हणाला, आज रविवार. नेहमीप्रमाणे कुत्री ऊठली. बाहेर जाऊन आली, जेवली. बाहेर जायला निघालो आणि धो धो पाऊस पडायला लागला. म्हणून येऊन झोपलो झाले. छान डोळा लागला होता अन् तु उठवलेस. मी म्हटलं, तू मला रात्रभर जागं ठेवलं होतंस. तो म्हणाला त्याची तू वसुली करीत आहेस का? मी म्हटलं, अर्थात ! जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत तरी निदान. बरं काही हरकत नाही म्हणाला. मी पण जास्त ताणून धरले नाही. काही हरकत नाही. तू आतां झोप परत असे म्हणून मी फोन बंद केला.

मी माझ्या तिन्ही मुलांना ते ज्यावेळी जन्मले त्यावेळी फोन करुन बर्थ डे विशेस देते. नीरजला दुपारी १२:०५ ला आणि लीनताला दुपारी ४:५६ ला. त्यामुळे त्यांना संवय झालीय माझ्या फोनची. रादर, तिघेही माझ्या फोनची वाट पहात बसतात. हे म्हणतात बरं झालं, आपली मुलं दिवसा जन्मली. रात्री अपरात्री जन्मली असती तर तू त्यावेळेस फोन करून त्यांना उठविले असतेस आणि त्रास दिला असतास. खूप विक्षिप्त आहेस तू. मी ते हंसण्यावर नेते. पण मनांत विचार आल्याशिवाय रहात नाही, खंरच, आपण मुलांची झोपमोड केली असती कां?

मी चार भिंतीत राहून कंटाळून गेले होते. ह्यांचे ३६ तास काम मग ८ तास घरी, मग परत ३६ तास काम मग ८ तास घरी. ३६ तासाचे कधीकधी ४० तासही होत. माझी नोकरी ८ तासांची, जाणं येणं धरुन १० तास जास्तीत जास्त. उरलेल्या वेळांत काय करणार? रात्री एकटी झोपायला पण भिती वाटे. माझी जी अवस्था तीच अवस्था लक्ष्मीची. कारण ए. सी. ह्यांना एक वर्ष ज्युनियर सर्जिकल रेसिडेंट. मग आम्ही दोघी एकमेकांच्या घरी जाऊन झोपायचो. एक दिवस ती यायची. एक दिवस मी जायची. त्यामुळे लीनता झाल्यानंतर मला एक सवंगडी मिळाला खेळायला असेच वाटले. मी आई झाले ही

भावनाच नाही. त्यानंतर नीरज आला. तेव्हां वाटले, बरं झालं, आतां लीनताबरोबर खेळायला नीरज आला. तरी माझ्यांतील आई कांही जागी झाली नाही. मग पराग आला आणि जणू जादूची कांडी फिरावी तशी माझ्यातील आई जागी झाली. आणि मी, खऱ्या अर्थाने आई झाले. मला अजूनही ह्या गोष्टीचे नवल वाटते. आई होणे म्हणजे काय महान फींलींग आहे हे प्रत्येक स्त्रीला आई झाल्यावर कळतेच. तसेच पुरुषांना पण बाप झाल्यावर हा अनुभव येतो हे मी ह्यांच्यावरुन खात्रीने सांगू शकते.

मी घरी नेहमी बाबूजींची गाणी लावून गुणगुणत असे. "तोच चंद्रमा नभांत तीच चैत्र यामिनी", "धुंद येथ मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले", "डांव मांडून भांडून जाऊ नको, डाव मोडू नको". ही माझी आवडती गाणी. ह्या गाण्यांची मी इतकी पारायणं केली आहेत म्हणून सांगू की त्यामुळेच की काय देवाने तथास्तु म्हटले आणि बाबूजींना आमच्याकडे पाठविले. माझ्या मते प्रत्येक गोष्टीला कॉज आणि ईफेक्ट असतो. केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे. तसे आहे हे.

हमखास मला बाबूजींची आठवण येते. त्यांचे मला आणि नीरजला ओवाळणे, माझ्या तोंडांत शिरा घालणे, दोन वर्षांनी परागला घेऊन मी घरी आले तेव्हां मला आणि परागला ओवाळणे, माझ्या तोंडांत लाडू घालणे, मला आराम करायला लावणे. जेवण झाले की माझ्या मागे लागणे, "आतां बाळ झोपलंय, वहिनी तुम्ही आराम करा, आम्ही स्वयंपाकघर आवरतो म्हणणे". हे आणि बाबूजी दोघेही मिळून सगळी झांकपाक करुन, भांडी डिशवॉशरमध्ये ठेवीत किंवा धुवून, पुसून जिथल्या तेथे ठेवत. माझे वेळापत्रक माझ्या बाळाच्या स्केज्युअलवर अवलंबून असे. त्यामुळे हे आणि बाबूजी मिळून कधी दुपारचा कधी सकाळचा चहा करीत, गप्पा मारीत बसत. बाबूजी घरी आले की मस्त वाटे. बाबूजी कधी पाहुण्यासारखे वागलेच नाहीत. आमच्या घरचाच एक घटक व्हायचे ते. नाहीतर आम्हांला आणि आमच्या काही मित्र मैत्रिणींना असेही अनुभव आले आहेत, जेथे नाकापेक्षां मोती जड म्हणायची पाळी आली. मला आठवते, पराग अजून जन्मला नव्हता, आमच्याकडे असेच एक सेलेब्रिटी कपल आले. मी, लीनता आणि नीरजला (वय वर्षे चार अणि एक), बरोबर घेऊन ह्या कपलला मॅनहॅटन दाखविण्यासाठी नेले. पूर्ण दिवस गेला त्यांत. वरुन पूर्ण खर्च मीच केला, त्याचे विशेष काही वाटले नाही मला. पण घरी आल्यावर त्या बाईंनी चक्क आरामखुर्चीत ताणून म्हटले, "थकले बाई, दिवसभर हिंडून. वहिनी, मस्तपैकी चहा करा आतां". मी पण त्यांच्यासोबतच माझ्या लहान लहान मुलांना घेऊन फिरले ना? वरून ही असं म्हणते. बाई आहे की आणखी कोण आहे ही? असा मनांत विचार आला पण वरून मी सोज्वळपणाने म्हटले, "आत्तां आणते हं " असं म्हणत मी स्वयंपाकघराकडे वळले. इकडे नीरजची कुरबुर सुरु होती डायपर बदलण्यासाठी. तिकडे दर्लक्ष करीत त्या दोघांसाठी चहा आणि चीवडा दिला. मगच मी नीरजला घेऊन त्याच्या बेडरुकडे वळले. मनांत विचार आला, आतां आई येथे असती तर नक्कीच तिने माझी पाठ थोपटली असती. तिचीच शिकवण. "अतिथी देवो भवः".

आणि ह्या बयेच्या अगदी विरुध्द आमचे बाबूजी. ह्या बाईला पाठवायला हवे बाबूजींकडे शिकायला. त्यातल्यां त्यात एक छान झालं, ही जोडी जाऊन येऊन महिनाभरच आमच्याकडे राहिली. आणि मी सुटले.

बाबूजी विनोद मस्त सांगतात. विनोद सांगतांना स्वतः बिलकूल हंसत नाहीत, अगदी सिरियसली सांगतात. विनोद सांगणे ही पण एक कला आहे. ती सगळ्यांनाच जमते असे नाही. एक दिवस मी बाळाचे आटोपून स्वयंपाकघरांत आले. दुपारचे चार, साडेचार वाजले असतील. बाबूजी आणि हे चहा पीत बसले होते. आणि बाबूजी ह्यांना जोक सांगणार होते. तितक्यांत मी आलेले पाहून मला म्हणाले, बसा वहिनी, मी तुम्हांला एक जोक सांगतो. मी बसले. बाबूजी मला म्हणाले, "तुम्हांला शेंगांच्या टरफलाचा शिरा करतां येतो कां?" मी म्हटलं, " शेंगाच्या टरफलाचा शिरा? नाही बुवा". मी सांगतो कसा करायचा ते?. माझी उत्सुकता वाढली. बाबूजींनी सांगायला सुरुवात केली. आधी कपभर रवा घ्यायचा तो साजुक तुपावर भाजायचा. त्यांत दोनअडीच कप गरम दूध घालायचे. नंतर त्यांत शेंगाची टरफलं घालायची. ते शिजत आले किं अर्धा पाऊण कप साखर, कमीजास्त तुम्हांला जितका शिरा गोड पाहिजे त्यावर अवलंबून आहे. मग त्यांत ईलायची पूड, पाहीजे असेल तर किंचित् केशर, बदाम, काजू, बेदाणे घालणे. मग एका वाटीत शिरा घालणे, आणि खायला देणे. खातांना अलगद शेंगाची टरफलं काढून टाकणे. आणि स्वतःच्या हातांने बाबूजी टरफलं काढल्याची ॲक्शन करतात. आणि मग शिरा खाणे. हे सगळं सांगतांना बाबूजी ईतके सिरियसली सांगतात किं काही विचारु नकात. आणि आम्हां दोघांची हंसून हंसून पुरेवाट झाली. तरी बाबूजी तटस्थ. आम्ही हंसलो तरी बाबूजी हंसत नाहीत. मग थोड्या वेळाने गालांतल्या गालांत हंसतात. असे वाटते, बाबूजी आपल्यासमोर बसले आहेत. पण बाबूजी कधीच काळाच्या आड गेले आहेत. हे लक्षांत आले की अजूनही नकळत दोन अश्रु निसटतातच आणि मन खूप विषण्ण होते.

**सुरेखा मद्दिवार**